पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - **७**
सभावृत्तांत

दि.- ५/१०/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची दिनांक ७/९/२०१६ रोजीची तहकूब सभा व बुधवार दि. ५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा.ची मासिक सभा इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

**१. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – अध्यक्ष**
२. मा.मंदाताई उत्तम आल्हाट
३. मा.सुनिता (माई) पांडूरंग गवळी
४ मा.आशा रविंद्र सुपे
५. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६. मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रीय अधिकारी- चंद्रकांत इंदलकर, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जयंत बरशेट्टी, कार्यकारी अभियंता (पापु), मा.कैलास थोरात- (कार्यकारी अभियंता विद्युत,) मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य), मा.श्री.वाघमारे एस.बी.- उपअभियंता, मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता, मा.ए.बी.कोंडे उपअभियंता (पापु), मा.श्री.लांडे बी.पी. उपअभियंता (विद्युत), मा.राऊत व्ही.एस (पापू), मा.श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), मा.एस.बी.शितोळे - क.अभियंता(जलनि:सारण), मा.संदीप ठोकळे- क.अभियंता, मा.श्री.धडस ए.आर.- क.अभियंता, मा.श्री.फेंडर निखील क.अभियंता (स्थापत्य/उद्यान), मा.श्री.सी.एन.खैरे - स.उद्यान निरीक्षक,एस.डी.रावते- मा. श्री. इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.प्रभाकर तावरे- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.नाडेकर बी.के. स.शिक्षक, श्री.डामसे आर.पी.-मलेरिया निरीक्षक, श्री.देशमाने पी.एस. कार्यालयीन अधिक्षक, श्रीमती जयश्री पवळे.समुहसंघटक,(नावियो विभाग)

-----

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

१ सुचक- मा. संजय निवृत्ती आहेर – अनुमोदक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे या आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**(मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

------

**मा.अध्यक्ष -** उरी येथील शहिद जवान यांना श्रध्दांजली व पाकिस्तानचा भ्याड हल्ल्याचा निषेध तसेच भाजपा शहराध्यक्ष मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे वडील पांडूरंग खंडूजी जगताप यांचे निधन झालेने इ प्रभाग समितीच्या वतीने भावपूर्वक श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. तसेच आजच्या सभेत दाखल झालेले ऐनवेळचे वि षय दाखल करुन गणसंख्याअभावी सदरची इ प्रभाग समितीची सभा क्रमांक ६ व ७ या शुक्रवार दिनांक १४/१०/२०१६ रोजी स. ११.०० वा.पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

-------

(सर्वांनी दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण केली)

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
अध्यक्ष
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक – ७
सभावृत्तांत
(दि.७/९/२०१६ व ५/१०/२०१६ रोजीची तहकुब सभा)

दि.- १४/१०/२०१६ वेळ दुपारी ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची बुधवार दिनांक ७/९/२०१६ व दि.५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता ची तहकुब सभा शुक्रवार दिनांक १४/१०/२०१६ रोजी दुपारी ११.०० वा इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर **– अध्यक्षा**
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.धनंजय मुरलीधर आल्हाट
४. मा.काळजे नितीन प्रताप
५. मा.वाबळे संजय मल्हारराव
६. मा.मडिगेरी वर्षा विलास
७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
८. मा.सुपे आशा रविंद्र
९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
१०. मा.गोफणे अनुराधा देविदास
११. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
१२. मा.लोंढे शुभांगी संतोष
१३. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
१४. मा.सोमवंशी प्रकाश ब. - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.चंद्रकांत इंदलकर – क्षेत्रीय अधिकारी**,** मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) मा.कैलास थोरात- कार्यकारी अभियंता, मा.श्री.संजय घुबे –उपअभियंता (स्थापत्य) मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.लांडे बी.पी.उपअभियंता (विद्युत), मा.श्री.व्ही.सी.काळे - उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.मनोज सेठीया-उपअभियंता (ज.नि), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.टी. एच. दाते – सहा.आरोग्य अधिकारी, मा.भानुदास किसन तापकीर - उद्यान अधिक्षक, मा.श्री.जी.एस.खैरे – स.उद्यान अधिक्षक, मा.श्री.माळी एस.के. – आरोग्य निरीक्षक (पशुवैद्यकिय) मा.श्री.नाडेकर बी.के. सहा.शिक्षक भोसरी, श्री.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक लांडेवाडी, श्री.देशमाने पी.एस. – कार्यालयीन अधिक्षक.

------

त्यानंतर  खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

१    सुचक- मा.शुभांगी लोंढे  –                    अनुमोदक- मा.सुनिता (माई) गवळी

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे या आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सुरखा शंकर गव्हाणे यांची  निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**(मा. सुरेखा शंकर गव्हाणे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात   करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

विषय क्रमांक  १. तरतूद वर्गीकरणाबाबत. प्रशासन विभागाकडील पत्र क्र. इक्षेका/१/कावि/९७६/२०१६, दिनांक ३०/९/२०१६ चे विषयपत्र.

विषय क्रमांक  २. प्रभाग क्र. ३१ दिघी व प्रभाग क्र.३५ भोसरी गावठाण हगणदारी मुक्त घोषीत करणे या कामाचा विषय येत्या प्रभाग समितीमध्ये घेणेबाबत आरोग्य विभागाकडील पत्र क्र.इक्षेआ/२/कावि/७०१/२०१६, दिनांक ३/१०/२०१६ चे विषयपत्र.

विषय क्रमांक  ३. प्रभाग क्र.३४ गव्हाणे वस्तीमधील शर्मा इंडस्ट्रीज आदिनाथनगर येथील मनपा सार्व.शौचालय पाडणे या कामाचा विषय म्हणून घेणेबाबत. आरोग्य विभागाकडील पत्र क्र.इक्षेआ/२/कावि/७७६/२०१६, दिनांक ६/१०/ २०१६ चे विषयपत्र.

विषय क्रमांक  ४. मोशी गट क्र.६७१ ते ६६९ पर्यंतचा १८ मी डी.पी.रस्त्याची रुंदी १२ मी.करणेबाबत. मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र.

-------

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीच्या सन्मा.नगरसेविका मा.मंदाताई उत्तम आल्हाट यांची मा.विधी समितीच्या सभापती पदी निवड झाल्याबद्दल इ प्रभाग समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. )

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीच्या सन्मा.नगरसेविका मा.अनुराधा देविदास गोफणे यांची मा.महिला बाल कल्याण समितीच्या सभापती पदी निवड झाल्याबद्दल इ प्रभाग समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. )

-----

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले. -------**

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक- १

दिनांक- - **१४/१०/**२०१६ विभाग – प्रशासन

सूचक- मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.संजय वाबळे

संदर्भ – प्रशासन विभागाकडील पत्र क्र. इक्षेका/१/कावि/६७६/२०१६,

दिनांक ३०/०९/२०१६ चे पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकात **"प्रवास भत्ता"** या लेखाशिर्षावर तरतूद ठेवणेत आलेली नाही. मा.क्षेत्रीय अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांनी कार्यालयीन कामकाजासाठी प्रवास केलेला असून त्यांना देय असलेली रक्कम अदा करणेकामी **"प्रवासभत्ता"** लेखाशिर्षातून रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. तथापि इ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रशासन विभागाकडील सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात **"अस्थायी आस्थापना"** या लेखाशिर्षावर तरतूद र.रु.१,५०,०००/- करणेत आली आहे. सदर लेखाशिर्षावर दिनांक २९/०९/२०१६ अखेर खर्च निरंक आहे व उर्वरीत शिल्लक र.रु.१,५०,०००/- आहे त्यामधून र.रु.५०,०००/- इतकी रक्कम **"प्रवास भत्ता"** या लेखाशिर्षावर वर्ग करणेकामी मा.प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रक्कमा नियमानुसार वर्ग करता येत असलेने सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक- २

दिनांक- - **१४/१०/**२०१६

सूचक- मा.संजय मल्हारराव वाबळे अनुमोदक – मा.सौ.सुरेखा शंकर गव्हाणे

संदर्भ – आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेआ/०२/कावि /७६१/२०१६,

दिनांक ३/१०/२०१६ चे विषयपत्र.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरांतील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक ०२/१०/२०१४

पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक्र२३/नवी/३४, दिनांक १५/०५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक ०२/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्टे निश्चीत केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दि.०१/०४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्प्याटप्पयाने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्टे निश्चीत केलेले आहे. त्या अनुषंगाने इ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ३१ दिघी हा प्रभाग दिनांक ३०/०९/२०१६ व प्रभाग क्र.३५ भोसरी गावठाण दिनांक ३१/१०/२०१६ पुर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेसंबंधी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक- ३

दिनांक- - १४/१०/२०१६

सूचक- मा.संजय मल्हारराव वाबळे अनुमोदक – मा.सौ.सुरेखा शंकर गव्हाणे

संदर्भ – आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेआ/०२/कावि /७७६/२०१६,

दिनांक ४/१०/२०१६ चे विषयपत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रीय कार्यालयीतील प्रभाग क्र. ३४ गव्हाणे वस्ती उपविभागातील मनपाचे सार्वजनिक शौचालय (१ ब्लॉक १२ सीट्स) हे सुमारे २० ते २५ वर्षे जुने असून ते मोडकळीस आलेले आहे तसेच स्थानिक नागरीकांकडे सद्यस्थितीत स्वत:चे वैयक्तिक शौचालय असुन तेथील नागरीक मनपा सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत नसून सदरचे सार्वजनिक शौचालय पाडणेबाबत तेथील सबंधीत नागरीकांची हरकत नसल्याचा अहवाल संबंधीत आरोग्य निरीक्षक यांनी दिला आहे. तसेच सदर प्रभागातील नगरसदस्या मा.सुरेखाताई शंकर गव्हाणे तसेच मा.श्री. महेशदादा लांडगे यांचे सदरचे सार्व.शौचालय पाडणेबाबत पुर्ण संमती आहे. त्यास अनुसरुन इ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील गव्हाणे वस्तीमधील शर्मा इंडस्ट्रीज, आदिनाथनगर येथील १ ब्लॉक १२ सीट्सचे मनपा सार्व. शौचालय पाडणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक- ४

दिनांक- - १४/१०/२०१६

सूचक- मा.नितीन काळजे अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ – मा.मंदाताई उत्तम आल्हाट नगरसदस्या, पिं.चिं.म.न.पा. यांचा अर्ज.

मोशी प्रभाग क्र. ६ येथील गट क्र. ६७१ ते ६६९ पर्यंतचा १८ मी.डी.पी. रस्त्याला अनेक वर्षापासून राहात असलेल्या नागरीकांची घरे/जागा बाधित होत आहे. सदर परिसरात ३० मी.रुंदीचा रस्ता डी.पी.रस्ता वहिवाटीसाठी उपलब्ध आहे त्याच्या काही भागाचे काम देखील चालू आहे. सबब १८ मी.रुंदीच्या रस्त्यामुळे बाधित होत

असलेल्या नागरीकांचे हितासाठी सदर रस्त्याची रुंदी १२ मीटर करणेतयावी व सदरचा प्रस्ताव मा.  इ प्रभाग समिती मध्ये मंजूर करुन मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे मंजूरीसाठी पाठविणेत यावा. सदर बाबत विनाविलंब कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

माहे डिसेंबर २०१६ ची प्रभाग समितीची मासिक सभा आचारसंहिता संपल्यानंतर आयोजित करण्यात यावी. अथवा आचारसंहिता शिथील झाल्यास ठरलेल्या दिनांक व वेळेस व्हावी.

सुचक – मा.जालिंदर शिंदे                अनुमोदक – मा.संजय वाबळे

--------

**मा. अध्यक्षा** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत आदेश देऊन सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
गव्हाणे सुरेखा शंकर
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/७७५ /२०१६
दिनांक-  २१/१०/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.